INLAND LETTER

# वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना (केवळ सभासदांसाठी)

To,

## जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे

If undelivered please return to :

मुख्य कार्यालय :
प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.
फोनः ०२०-२६७०४३००-०४ (५ लाईन्स)
www.janasevabankpune.net


कोणत्याही UPI ॲपची आपण करा निवड
जनसेवा बँक असूद्या आपली आवड !



# जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर,पुणे.

मुख्य कार्यालयः प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.
फोनः ०२०-२६७०४३००-०४ (५ लाईन्स)
Website: www.janasevabankpune.net


## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना (केवळ सभासदांसाठी)

बँकेच्या सभासदांची ५१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दि. ०९.०६.२०२३ रोजी दुपारी ठीक ४.०० वाजता **पुणे विद्यार्थी गृहाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅन्ड टेक्नॉलॉजीचे मुक्तांगण सभागृह, स. नं. ४४, पर्वती, पुणे ४११००९** येथे खालील नमूद केलेल्या विषयांचा विचार करण्यासाठी आयोजित केली आहे. सदर सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

**– सभेपुढील विषय –**

१. दिनांक २७.०८.२०२२ रोजी झालेल्या ५० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.

२. मा. संचालक मंडळाने मंजूर केलेला ५१ वा वार्षिक अहवाल व दिनांक ३१ मार्च २०२३ अखेरचा मा. वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेला ताळेबंद, नफा–तोटा पत्रक यास मान्यता देणे.

३. सन २०२२–२३ चा मा. वैधानिक लेखा परीक्षकांचा अहवाल वाचून त्याची नोंद घेणे.

४. सन २०२१–२२ या आर्थिक वर्षाच्या मा. वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालाच्या दोषदुरूस्तीची नोंद घेणे.

५. मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२२–२३ वर्षातील नफा वाटणीस मंजूरी देणे.

६. सन २०२२–२३ या आर्थिक वर्षासाठी मा.संचालक मंडळाने शिफारस केलेल्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या नियुक्तीस मान्यता देणे व मा. वैधानिक लेखापरीक्षकांचा मेहेनताना ठरविण्याचे अधिकार मा. संचालक मंडळास देणे.

७. मा. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जांची नोंद घेणे.

८. बँकेच्या प्रचलित पोटनियमामध्ये मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या दुरुस्ती व नव्याने समाविष्ट केलेल्या पोटनियमास मान्यता देणेबाबत.

९. स्टाफिंग पॅटर्नला मंजूरी देणे.

१०. सन २०२३–२४ साठीचे अंदाजपत्रकाची नोंद घेणे.

११. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची रजा मंजूर करणे.

१२. मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे अन्य विषय.

**मा.संचालक मंडळाच्या आज्ञेवरुन**
– सही –
**शिरीष निवृत्ती पोळेकर**
मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रभारी)

स्थान : हडपसर, पुणे
दिनांक : २४.०५.२०२३

**● विशेष सूचना ●**

❶ गणसंख्ये अभावी सभा तहकूब झाल्यास ही सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी संध्याकाळी ठीक ४.३० वाजता होईल. अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही. ❷ वार्षिक अहवालाची प्रत दि. ३१.०५.२०२३ पासून नजिकच्या शाखेत कामकाजाच्या वेळेत उपलब्ध राहील. सदर सूचना दाखवून अहवाल प्रत शाखेतून घेण्यात यावी. ❸ बँकेच्या कामकाजाबाबत काही माहिती हवी असल्यास वा काही सूचना करावयाच्या असतील तर त्या सूचना वा प्रश्न बँकेच्या हडपसर येथील मुख्य कार्यालयात बँकेच्या कामकाजाच्या वेळेत दि.०५.०६.२०२३ पर्यंत लेखी अथवा member@janasevabankpune.in वर मेलद्वारे पाठवाव्यात. वरील विषयासंबंधीची कागदपत्रे हडपसर येथील मुख्य कार्यालयात कामकाजाच्या वेळेत पहावयास मिळतील. ❹ आपला पत्ता बदलला असल्यास नवीन पत्ता पूर्ण तपशीलासह नजिकच्या शाखेमार्फत बँकेच्या मुख्य कार्यालयास आपल्या मोबाईल नंबर व ईमेल आयडीसह सत्वर कळवावा ❺ सन २०२२–२३ चा बँकेचा ताळेबंद व नफा तोटा पत्रक बँकेच्या www.janasevabankpune.net या संकेत स्थळावर पाहता येईल. ❻ मागील २ ते ३ अहवालात वारंवार आवाहन करून सुद्धा ज्या सभासदांनी त्यांचे रु. २५/– दर्शनी मूल्याचे भाग रु.१००/– मूल्यामध्ये परिवर्तित करून घेतलेले नाहीत अशा सर्व सभासदांनी दि.३१.१२.२०२३ पूर्वी सदर भाग परिवर्तित करून घेणे बंधनकारक आहे.